# ८. यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार

मोहिते दिगंबर तुळशीदास
सहाय्यक प्राध्यापक, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**प्रस्तावना**

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांच्या विषयी महाराष्ट्रीयन जनतेच्या मनात श्रद्धा,आदर आणि प्रेम आहे. त्यांनी दाखवलेली दूरदृष्टी आणि निर्णयामुळेच आधुनिक महाराष्ट्र घडला. राष्ट्रीय पातळीवरही त्यांनी आपल्या कर्तृत्वाने अनेक क्षेत्र पादाक्रांत केली. संरक्षण मंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री या खात्याचे कामकाज त्यांनी पाहिले. त्याचसोबत त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वामुळेच भारताने उपपंतप्रधान पदही चालून आले.

यशवंतराव चव्हाण हे फक्त राजकारणी नव्हते तर ते साहित्यिक देखील होते त्यांनी अनेक पुस्तक प्रसिद्ध केली. बहुरंगी व्यक्तिमत्व लाभलेल्या यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार या शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे.

**यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांवरील समाजवादाचा प्रभाव**

कोणत्याही विचारवंताच्या विचारावर कोणत्यातरी तत्त्वाचा प्रभाव असतो अगदी त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाणांवर समाजवादी विचाराचा प्रभाव असल्याचे दिसून येते अर्थात हे समाजवादी विचार पाहण्यापूर्वी समाजवाद म्हणजे काय? त्याविषयी पाहणे महत्त्वाचे आहे.

**समाजवाद**

संपत्तीचे उत्पादन समाजाच्या मालकीचे ठेवून सर्वांना समान मानणारी व संपत्तीचे न्याय्य वितरण करून सर्वांना एकाच पातळीवर आणणारी विचारप्रणाली म्हणजेच समाजवाद होय.[1]

**यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांवरील समाजवादाचा प्रभाव**

यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा पाया त्यांच्या शालेय जीवनातच घातला गेला. यशवंतराव चव्हाणांवर समाजवाद, गांधीवाद आणि मार्क्सवादाचा प्रभाव होता. यशवंतरावांची समाजवादासोबतची ओळख शालेय जीवनातच झाली. गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ देशात सुरू केल्यानंतर त्या चळवळीमध्ये यशवंतराव चव्हाण यांनी शालेय जीवनात उडी मारली आणि कराडमध्ये प्रभात फेऱ्या, झेंडावंदन इत्यादी कार्यक्रम घेतल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. अटकेच्या काळात यशवंतरावांवर समाजवादाचा प्रभाव पडला कम्युनिस्टांचा जाहीरनामा भुस्कुटे यांच्याकडून यशवंतरावांना वाचावयास मिळाला.[2]

यशवंतराव चव्हाण आपल्या आत्मचरित्रात कृष्णाकाठ भाग एक मध्ये येरवडा येथील तुरुंगातील आठवणींना उजाळा देताना सांगतात की ,गांधीवादाच्या चर्चेबरोबर समाजवाद आणि मार्क्सवाद याही विचारांची बराकीतील या वर्गात चर्चा सुरू झाली आणि त्याचे पोषक असे वाङ्मयही  आम्हा लोकांना वाचण्यासाठी मिळू लागले. आमचे राजकीय शिक्षण हे या पद्धतीने फार सातत्याने व मोठ्या तीव्रतेने सुरू झाले. काय वाचावे आणि काय वाचू नये असे वाटावे इतक्या पुस्तकांचा साठा तेथे जमला होता.



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati